# गावाचा पर्यावरणपूरक आराखडा !

oikos
for Ecological Services

## स्वयंपूर्ण समृद्ध गाव !

महाराष्ट्राच्या जैव-भौगोलिक परिस्थितीनुसार हवामान, माती, वनस्पती – प्राणीजीवन बदलते आणि गाव पातळीवर नैसर्गिक स्त्रोतांचा वापरही. त्याच बरोबर गावाचे पाणलोट क्षेत्र, डोंगराळ भाग, ओढे, जंगल, शेतीच्या पद्धती बदलताना दिसतात. आजच्या विकासकेंद्री अर्थव्यवस्थेत नैसर्गिक साधनसंपत्तीमधे झपाट्याने घट होत आहे. गावपातळीवर सभोवतालच्या क्षेत्राचा आणि नैसर्गिक स्त्रोतांचा विकास शाश्वत पद्धतीने करणे गरजेचे आहे. ह्याकरता काही योजना राबवायची असल्यास खालील मुद्दे महत्वाचे ठरतील.




*नमुना नकाशा*

**१. आदर्श भूरूप : गावाच्या पाणलोट क्षेत्राचा योग्य विचार आणि वापरमालकी वैयक्तिक, आखणी सामुहिक**या सुत्रानुसार भूरुपाची स्थिती ओळखून गावाच्या क्षेत्राचा विचार व आखणी केल्यास दीर्घकाळ टिकणारे शाश्वत फायदे मिळू शकतील. हे सूत्र शेती, वरकस / पडीक जमीन, सामाईक क्षेत्र, राखीव जमिनी, वन अखत्यारीतील जमीन, विहिरी, तळी, ओढे-नद्या ह्या सर्वांना लागू करावे लागेल. यात काही प्रमाणात नैसर्गिक स्त्रोतांच्या वापरावर नियंत्रण असेल, पण त्याचा उपयोग संपूर्ण गावाला आणि पुढच्या पिढ्यांना होईल.

**२. जिवंत माती:**

शेती असो किंवा निसर्ग, मातीची गुणवत्ता आणि ओलावा धरून ठेवण्याची क्षमता सगळ्यात महत्वाची. मातीत भरपूर जैविक काडीकचरा टाकून मातीचे तापमान कमी नियंत्रित केले तर त्यात विघटन करणारे जीवाणू वाढीस लागतात आणि मातीची ओलावा धरून ठेवण्याची क्षमता वाढते.

**३. पाण्याची स्वयंपूर्णता:**

पाण्याची स्वयंपूर्णता येण्यासाठी पाणलोटक्षेत्र विकास, भूजल पुनर्भरण हे शाश्वत मार्ग आहेत, ज्यासाठी सामुहिक पातळीवर प्रयत्न करावे लागतील. तज्ञांच्या मदतीने पुनर्भरणाकरता सुयोग्य ( recharge zones) असे पाणलोटक्षेत्रातील भूभाग जाणून घेऊन त्यावर काम करणे. वर्षभर वाहणाऱ्या झऱ्यांची ( springs) देखभाल देखील महत्वाची आहे.

**४. चारा कुरणे :**

मुक्त चराईमुळे होणारे तोटे कमी करण्यासाठी आणि स्थानिक सकस गवते वाढवून उत्तम प्रतीचा चारा उपलब्ध होण्यासाठी गायरानासारख्या सामुहिक जमिनीवर एकत्रित प्रयत्न होणे गरजेचे आहे. गावातल्या काही भूभागावर राखीव कुरणे करणे गरजेचे, ज्यातून चांगल्या प्रतीचा चारा कापून नेता येऊ शकेल. आणि काही भागावर चराऊ कुरणे, ज्यात चक्राकार पद्धतीने चराई सुरु ठेवता येईल. गाव पातळीवर विचार केल्यास, सामुहिक जमिनींबरोबर वैयक्तिक पडीक जमिनींवर देखील अशी कुरणे तयार करता येतील.

**५. सरपण लागवड:**

चांगला उष्मांक असलेल्या झाडांची मुद्दाम लागवड करून, घराच्या / गावाच्या जवळ सरपण उपलब्ध होऊ शकेल आणि पर्यायाने जंगलांचा ह्रास होणार नाही.

**६. वनशेती :**

जमिनीवर वृक्षांचे आच्छादन आणि त्यातून उत्पादन असा दुहेरी फायदा वनशेतीचा होऊ शकतो. मातीची धूप थांबवणे, वाहून जाणारे पाणी अडवणे व मुरवणे, जैवभार वाढवणे, खालच्या बाजूच्या शेतीला पोषण द्रव्य पुरवणे, इत्यादी  अनेक फायदे डोंगर उतारांवर वृक्ष लागवड केल्याने मिळू शकतात.

**७. शेती:**

शेतीची मालकी जरी वैयक्तिक असली तरी गावपातळीवर नियोजन केल्याने आणि उत्पादन वितरणाचे एकत्रित धोरण ठरवल्याने फायदे मिळाल्याची उदाहरणे आहेत. याशिवाय, मातीची प्रत सुधारणे, ओलावा वाढवणे, चक्राकार पद्धतीने नगदी पिके घेणे, मिश्र पिक पद्धती इत्यादी गोष्टींचा उपयोग शेती स्वयंपूर्ण करायला होऊ शकतो.

**८. कचरा व्यवस्थापन:**

कचऱ्याचे वर्गीकरण करणे. ओला व सुका कचरा किंवा कुजू शकणारा आणि कुजू न शकणारा कचरा वेगवेगळे करणे. कुजू शकणाऱ्या कचऱ्याचे खत तयार करणे. कुजू न शकणारा कचरा पुनर्नविकरण्यास पाठविणे.

**९. जंगल पुनरुज्जीवन: माणूस आणि निसर्ग, दोहोंचा विचार !**

प्रत्येक गावाच्या क्षेत्रात, माणसाबरोबर इतर जीवांच्या गरजांचा विचार करून एकत्रित आराखडा बनवणे. ज्यात, स्थानिक परिस्थितीनुसार ओढ्यांच्या उगम प्रदेशात जंगल, ओढे-नद्या यांचे काठ, यांचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे. याकरता ओढ्यांच्या उगमाचा प्रदेश उचित ठरेल.

**आजच सुरुवात करूयात, एका छोट्या कृतीतून ! आपल्या भागातील जैवविविधता वाढवूयात ! एका एकरावर 'जीविधता उद्यान' करूयात. अधिक माहितीसाठी WhatsApp करा 7888 000 626.**

ऑयकॉस फॉर इकॉलॉजीकल सर्विसेस, २१०, सिद्धार्थ टावर्स, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन : ०२० २५४५१८७५ | ई मेल: oikos@oikos.in | वेब साईट : www.oikos.in